जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2024
लोकमत



शिवाजी विद्यापीठाचा आज, सोमवारी ६२ वा वर्धापन दिन साजरा होत आहे. त्यानिमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा आज, सोमवारी ६२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थितीत असतील. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम होईल. आज, सोमवारी सकाळी साडेआठ वाजता ध्वजवंदन व पावणे नऊला वर्धापन दिन समारंभाला सुरुवात होईल. वर्धापन दिनानिमित्त गुणवंत पाल्यांचा सत्कार होणार आहे. यावेळी बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्या सुमतीबाई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव होईल. प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्काराचेही वितरण होणार आहे. वर्धापन दिनानिमित्त मुख्य प्रशासकीय भवनास आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

18 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ उजळले...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा सोमवारी (दि. १८) ६२ वा वर्धापन दिन साजरा होत आहे. या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर करण्यात आलेली आकर्षक विद्युतरोषणाई. (छाया : पप्पू अत्तार)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

## कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन समारंभ सोमवार, दि. १८ रोजी राजर्षी शाहू सभागृह येथे सकाळी ८.३० वाजता साजरा होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल.



वर्धापन दिन कार्यक्रमात विद्यापीठातील गुणवंत शिक्षक, प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय सेवक यांची शैक्षणिक गुणवत्ता संपादन केलेली पाल्ये, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीताई पांडुरंग पाटील आदर्श शिक्षिका पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव केला जाणार आहे. तसेच प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

18 NOV 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्युत रोषणाईने उजळला शिवाजी विद्यापीठ परिसर...



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापनदिनानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने विद्यापीठ परिसर उजळून गेला आहे. (छाया : शशिकांत मोरे)

# शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी प्रमुख पाहुणे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापनदिन आज (दि. १८) सकाळी ८ वाजता ध्वजारोहणाने होणार आहे. सकाळी ८.४५ राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी उपस्थित राहणार आहेत. तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी गुणवंत शिक्षक व प्रशासकीय सेवक, संलग्न महाविद्यालयातील गुणवंत प्राचार्य, शिक्षक व प्रशासकीय सेवक, विद्यापीठातील शिक्षक व प्रशासकीय सेवकांची शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त पाल्य, बॅ. पी. जी. पाटील आदर्श शिक्षक व प्राचार्य सुमतीबाई पांडूरंग पाटील आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा गौरव, प्रशासकीय गुणवत्ता अभियान पुरस्कार देवून सन्मानित केले जाणार आहे. तरी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 NOV 2024
पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन सोमवारी साजरा करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ विद्यार्थ्याचे अमर खोत यांनी टिपलेले छायाचित्र.

18 NOV 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाचा टक्का वाढविण्याचे आव्हान

## शिवाजी विद्यापीठाचा आज वर्धापन दिन; गुणवत्ता सिद्ध तरीही नेटाने वाटचाल करावी लागणार

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र शिवाजी विद्यापीठ उद्या सोमवारी ६२ वा वर्धापन दिन साजरा करणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची कॅटॅगरी वन श्रेणी आणि नॅकचे अव्वल मानांकन पटकावून गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यापीठाचा नवा बदल स्वीकारात कायापालट होत आहे. वसतिगृह, अधिविभागांच्या नव्या इमारती उभारत आहेत. पेटंटचा टक्का वाढला आहे. नव्या अभ्यासक्रमातून अद्ययावत शिक्षण आणि वर्षागणिक संशोधनातील कामगिरी वाढवत वाटचाल सुरू आहे. पण, दुसरीकडे स्वायत्त महाविद्यालय आणि क्लस्टर, खासगी विद्यापीठांच्या वर्षागणिक वाढणाऱ्या संख्येमुळे आता या ज्ञानकेंद्रासमोर विद्यार्थी संख्या कायम राखणे, प्लेसमेंटचे प्रमाण आणि संशोधनाचा टक्का वाढविणे आदी आव्हाने उभी आहेत. ती पेलत सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी देण्यासाठी विद्यापीठाला नेटाने उभे राहावे लागणार आहे.**



कोल्हापूर : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा वर्धापन दिन सोमवारी साजरा होत आहे. त्यानिमित्त विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनास आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली आहे.

### अशी आहेत आव्हाने

१ संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण उपलब्ध झाल्याने तेथे प्रवेशित होण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. त्याने विद्यापीठ कॅम्पसमधील अभ्यासक्रमांसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण पाच ते दहा टक्क्यांनी कमी झाले आहे. विद्यापीठात प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढवावे लागेल.

२ विज्ञान विद्याशाखेतील प्लेसमेंटचे प्रमाण चांगले. वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्याशाखा आदी इतर शाखांतील प्लेसमेंटचे प्रमाण १५ ते २० टक्क्यांनी वाढविणे आवश्यक.

३ एनआयआरएफ, क्यू रँकिंगमधील मानांकन सुधारण्यासाठी विज्ञानबरोबरच इतर विद्याशाखांमधील आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधनाचा टक्का वाढविण्याचे मोठे आव्हान

४ प्रशासकीय सेवकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून, त्याने प्रशासनावर आणि प्राध्यापकांच्या ५० टक्के जागा रिक्त असल्याने अध्यापन, संशोधन कार्यावर येत असलेला ताण कमी करणे

५ विद्यापीठ कॅम्पसवरील खर्च कमी ठेवण्यासह विद्यार्थ्यांना माफक शुल्कामध्ये गुणवत्तापूर्ण आणि अन्य खासगी, स्वायत्त विद्यापीठांच्या तुलनेत दर्जेदार शिक्षण आणि त्यादृष्टीने आवश्यक सुविधा उपलब्ध करणे

### विद्यापीठाची कार्यवाही काय?

१ कॅम्पसमधील अधिविभागांमध्ये बी.ए. स्पोर्टस्, बी.ए. फिल्म मेकिंग, बी.कॉम. (बीएफएसआय), बी.एस्सी.- एम.एस्सी. इकॉनॉमिक्स आदी नावीन्यपूर्ण, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. ऑनलाईन शिक्षणावर भर दिला आहे. एमबीए पाठोपाठ एम. एस्सी., मॅथेमॅटिक्स, कॉम्प्युटर सायन्स, एम. कॉम. अभ्यासक्रम ऑनलाईन सुरू केले जाणार आहेत

२ आंतरराष्ट्रीय विद्यापीठासमवेत सामंजस्य करार केल्याने तेथे संशोधन आणि संशोधक विद्यार्थी म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना संधी मिळाल्या आहेत. प्लेसमेंट वाढीसाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थांसमवेत करारांचे प्रमाण वाढविण्यावर भर

३ विज्ञान आणि इतर विद्याशाखांनी संयुक्तपणे संशोधन करण्याची सुरुवात

४ प्रशासनात आयसीटीचा वापर वाढविला जात आहे. त्याची सुरुवात अकौंट, परीक्षा, संलग्नता, विद्यार्थी सुविधा केंद्रात केली आहे. प्राध्यापकांच्या ७२ पदांची भरती प्रक्रिया सुरू


५ पाण्याबरोबर आता विजेबाबतही स्वयंपूर्ण होण्यासाठी नवा ५५० किलोवॉटच्या सौरऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू. कॅम्पस सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही, नेटवर्किंगच्या वापरले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिक्षण घेतल्यानंतर त्यांना पुढील रोजगार अथवा शिक्षण, संशोधनाची खात्री देणारे नवे अभ्यासक्रम राबविण्याचे धोरण ठरविले जात आहे.

> ६२ वर्षांमध्ये विद्यापीठाने विविध स्थित्यंतरातून वाटचाल करत संशोधन, शिक्षणात ठसा उमटविला आहे. सोशल कनेक्ट वाढविला आहे. सर्व घटकांशी संवाद साधून त्यांना बरोबर घेऊन काम सुरू आहे. आता नवीन आव्हाने समोर आहेत. ती यशस्वीपणे पेलून 'एनआरआयएफ' रँकिंगमध्ये पहिल्या शंभर संस्थांच्या यादीत विद्यापीठाचा समावेश करण्याचे ध्येय ठेवून प्रशासकीय गती कायम ठेवत आम्ही निघालो आहोत. पुढील पाच वर्षांत ही गती कायम ठेवली तर निश्चितपणे यश मिळणार आहे.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

### उल्लेखनीय पावले

- पदवी, पदव्युत्तर पातळीवर नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांची सुरुवात
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत राज्यात आघाडी
- पी. एम. उषा योजनेतून मिळविला वीस कोटींचा निधी
- लोकसहभाग, देणगीतून मुलींसाठी वसतिगृहाची उभारणी
- कुस्ती कॉम्प्लेक्सची उभारणी, खेळाडूंना प्रोत्साहन निधी

### दृष्टिक्षेपात विद्यापीठ




दूरस्थ, ऑनलाईन शिक्षण केंद्राचे विद्यार्थी संख्या- सुमारे २५ हजार

विद्यार्थी संख्या- सुमारे २ लाख २५ हजार